# 'राजकारण्यांनी नद्या विकायला काढल्या आहेत'

## डॉ. राजेंद्र सिंग यांची घणाघाती टीका

**मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी)** – राज्यातील प्रदूषित नाले नदीला जोडत त्या नद्या प्रदूषित करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आधी नद्या प्रदूषित करायच्या आणि नंतर प्रदूषित नदीतील पाण्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी कोट्यवधी रकमेचा निधी उभारत त्यात भ्रष्टाचार करायचा, असे लज्जास्पद प्रकार सर्रासपणे सुरू असल्याचे सांगत राजकारण्यांनी नद्या विकायला काढल्याची घणाघाती टीका डॉ. राजेंद्र सिंग यांनी आज येथे केली.

जल बिरादरी, निरी, मुंबई पाणी आणि आयएमसी यांच्या संयुक्त विद्यमाने चर्चगेट येथील इंडियन मर्चंट चेंबरच्या सभागृहात 'मुंबईला पुरवठा होणाऱ्या पाण्याचे ऑडिट' या विषयावर आयोजित चर्चासत्रात डॉ. राजेंद्र सिंग बोलत होते. या वेळी इको लॉजिक्सचे जनक दफ्तरी, मुंबई महापालिकेचे हायड्रोलिक इंजिनिअर डी. गोंदालिया, पालिकेचे निवृत्त हायड्रोलिक इंजिनिअर टी.व्ही. शहा आणि इको नीड्स फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रो. प्रियानंद आगळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.